# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-१६८६/२०२४

**अपिलार्थी, ABDUL MAJID MEHMOOD KHAN,**
**१९/२१, १ST FLOOR, KHATIJA VILLA, NESBIT ROAD,**
**MAZGAON, MUMBAI ४०० ०१०.**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा तलाठी,
तलाठी सजा शेलू, ता.कर्जत,
जि.रायगड ४१० १०१.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा मंडळ अधिकारी
अधिकारी, मंडळ अधिकारी कार्यालय नेरळ,
ता.कर्जत, जि.रायगड ४१० १०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १०.३.२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १.२.२०२४ | ---- | २६.३.२०२४ | --- |

अपिलार्थी यांनी दि.१०.५.२०२४ रोजीच्या अर्जान्वये "माहिती प्राप्त झाली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १०.३.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीम. वैशाली तुकाराम मान्हे, ग्राम महूसल अधिकारी, शेलू, विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीम. मेघा जयवंत गायकवाड, ग्राम महसूल अधिकारी, शेलू, श्री. आशिष यादवराव राऊत, तत्कालीन तलाठी दामत, विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. निखिल वसंत लदगे, ग्राम महसूल अधिकारी, दामत तसेच विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी श्री. विश्वास लक्ष्मण गडदे, मंडळ अधिकारी, नेरळ हे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(Please furnish the certified copies of Panchnama, Affidavit and other documents submitted by Seema Banu Abdul Nasir Khan on २५.०४.२००१.) "*

*"(Need Certified copy of Panchnama, Affidavit and other documents submitted by Seema Banu Abdul Nasir Khan on२५.४.२००१ in respect of agriculture land bearing CTS No. २०१/१ A -२ (१), २१४/१, २०१/१ A २ (२), १७८/२ of Village Damat, Taluka Karjat, District Raigadh, Maharashtra for inclusion of her name as legal heir of Late Gulamgaus Mehmood Khan in the Office of Talati, Shelu, Taluka Karjat, Dist. Raigad ४१० १०१ which was approved on १५.६.२००१.)"*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

या प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झालेली नाही त्यामुळे त्यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलामध्ये सुनावणी झाली नाही अथवा कोणतेही आदेश पारित करण्यात आले नाहीत.

विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. निखिल वसंत लदगे, ग्राम महसूल अधिकारी, दामत यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती म्हणजे वारस पंचनामा प्रत व शपथपत्र हे त्यांच्या अभिलेखामध्ये सध्या उपलब्ध नाहीत.

अपिलार्थी यांनी तलाठी दामत, ता. कर्जत, जि. रायगड येथील फेरफार क्र.१९९३ याद्वारे मयत गुलामगौस मेहमूद खान आणि सीमा बानु अब्दुल नसीर खान यांची नावे लावण्यात आली आहेत. सदरची नोंद वारस पंचनामा व वारस नोंदवहीवरून घेण्यात आली आहेत. अशा आशयाचा शेरा दि.१८.६.२०१९ रोजी मंजूर करण्यात आला आहे.

अपिलार्थी यांनी नोंदवही, साक्षांकित प्रती, पंचनामा व शपथपत्र या कागदपत्रांची मागणी केली आहे. या संदर्भात विद्यमान जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, याबाबत ते पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करतील. विद्यमान जन

माहिती अधिकारी यांचे हे म्हणणे मान्य करता येत नाही. कारण वारस फेरफार मूळ संचिका ही कायमस्वरूपी जतन करण्याचा अभिलेख आहे. त्यामुळे ही नस्ती गहाळ झाली असल्यास त्यासाठी जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

सबब, सदरची माहिती शोध घेऊनही उपलब्ध न झाल्यास माहिती गहाळ होण्यासाठी जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचा-यांवर जबाबदारी निश्चित करून शिस्तभंगाची कार्यवाही करावी व तसा लेखी अहवाल पुढील सुनावणीस **तहसिलदार, तहसिल कार्यालय कर्जत** यांनी स्वत: उपस्थित राहून सादर करावा. सदरचा कायमस्वरूपी अभिलेख गहाळ झाल्याने महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार तहसिलदार, तहसिल कार्यालय कर्जत यांनी संबंधित पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करून तसा अहवाल पुढील सुनावणीस आयोगाकडे स्वत: उपस्थित राहून सादर करावा. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आशिष यादवराव राऊत, तलाठी दामत यांनी अपिलार्थी यांना विहित मुदतीत अथवा त्यानंतरही माहिती पुरविली नसल्यामुळे त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आशिष यादवराव राऊत, तलाठी दामत यांनी पुढील सुनावणीस आयागोकडे स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. त्याचप्रमाणे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदर नस्तीचा शोध घेऊन अपिलार्थी यांना त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसांत शीघ्र टपालाने विनामूल्य पुरविणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

१. **विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्राम महसूल अधिकारी, शेलू यांनी अपिलार्थी यांना त्यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसात शीघ्र टपालाने विनामूल्य पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.**

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आशिष यादवराव राऊत, तलाठी, ग्राम महसूल अधिकारी, दामत यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक १.२.२०२४ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु. २५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, **याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे दि.२१.४.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, प्रस्तुत प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

३. सदरची माहिती शोध घेऊनही उपलब्ध न झाल्यास माहिती गहाळ होण्यासाठी जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचा-यांवर जबाबदारी निश्चित करून शिस्तभंगाची कार्यवाही करावी व तसा लेखी अहवाल **तहसिलदार, तहसिल कार्यालय कर्जत यांनी आयोगाकडे दि.२१.४.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा.**

४. **सदरचा कायमस्वरूपी अभिलेख गहाळ झाल्याने महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार तहसिलदार, तहसिल कार्यालय कर्जत यांनी संबंधित पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करून तसा लेखी अहवाल आयोगाकडे दि.२१.४.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा.**

५. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२१.४.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १० मार्च, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
**तहसिलदार, तहसिल कार्यालय कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड ४१० १०१.**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आशिष यादवराव राऊत, ग्राम महसूल अधिकारी, दामत,
शेलू, ता. कर्जत, जि. रायगड
**-यांना प्रत** विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. निखिल वसंत लदगे, ग्राम महसूल अधिकारी, दामत,
शेलू, ता. कर्जत, जि. रायगड **यांचेमार्फत रवाना.**



राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ

अपिल क्रमांक : के.आर-१६८६/२०२४

अपिलार्थी, ABDUL MAJID MEHMOOD KHAN,

सुनावणी दिनांक २१.४.२०२६ (In continuation of order dt.१०.३.२०२६)

विवेचन

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तथापि, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

या प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

दि.१०.३.२०२६ रोजीच्या आदेशान्वये तहसिलदार, तहसिल कार्यालय कर्जत यांना सदरची माहिती गहाळ होण्यासाठी जबाबदार असलेल्या अधिकारी/कर्मचा-यांवर जबाबदारी निश्चित करून शिस्तभंगाची कार्यवाही करून त्याबाबतचा लेखी अहवाल आयोगास आजरोजी सादर करण्याबाबत आदेश पारित केले होते. त्याचप्रमाणे कायमस्वरूपी अभिलेख गहाळ झाल्याने महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार तहसिलदार, तहसिल कार्यालय कर्जत यांनी संबंधित पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करून तसा लेखी अहवाल आयोगाकडे सादर करण्याचे आदेशदेखील दिले होते. तथापि, आजच्या सुनावणीस तहसिलदार, तहसिल कार्यालय कर्जत उपस्थित नाहीत. त्यांना आजच्या सुनावणीची नोटीस प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. सबब, या सर्व अधिका-यांना पुन्हा सुनावणीची नोटीस काढण्यात यावी. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

आदेश

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१९.५.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता घेण्यात येईल.**

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २१ एप्रिल, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
**तहसिलदार, तहसिल कार्यालय कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड ४१० १०१.**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. आशिष यादवराव राऊत, ग्राम महसूल अधिकारी, दामत,
शेलू, ता. कर्जत, जि. रायगड
**-यांना प्रत** विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. निखिल वसंत लदगे, ग्राम महसूल अधिकारी, दामत,
शेलू, ता. कर्जत, जि. रायगड **यांचेमार्फत रवाना.**

**(विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना सदरची नोटीस न बजाविल्यास त्यांना जबाबदार धरण्यात येईल).**